मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल



बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



www.newsexpressmarathi.com » पुणे, पिंपरी-चिंचवड » सोमवार, दि. 26 मे 2025 | पान- 1


# पिंपरी चिंचवड शहरातील रस्त्यांवर 'अर्बन स्ट्रीटस्केप्स'

## पादचारी व सायकलस्वारांसाठी रस्ते अधिक सुरक्षित होण्यासाठी प्राधान्य : पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने शहरातील प्रमुख रस्ते सुरक्षित बनवण्याच्या दृष्टिने प्रकल्प हाती घेतला

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने शहरातील प्रमुख रस्ते अधिक सुरक्षित व सर्वसमावेशक बनवण्याच्या दृष्टिने 'अर्बन स्ट्रीटस्केप्स' प्रकल्प हाती घेतला आहे. या अंतर्गत दापोडी, निगडी प्राधिकरणसह शहरातील विविध भागातील रस्ते नागरिकांसाठी सुरक्षित, वाहतुकीच्या सुरळीत संचलनासाठी बनवण्यात येत आहेत. या रस्त्यांवर सलगपणे चालताना पादचाऱ्यांना सुरक्षिततेबाबत कोणतीही अडचण येणार नाही, याला प्राधान्य दिले जात आहे.




अर्बन स्ट्रीटस्केप्स' या प्रकल्पाचा आराखडा तयार करताना नागरिक, निवासी संस्था, विक्रेते, दुकानदार, वाहतूक पोलीस आदी सर्व घटकांचे आयटीडीपी इंडिया संस्थेने सर्वेक्षण केले. मुंबई-पुणे जुन्या महामार्गावर देखील पादचारी नागरिकांसाठी विनाअडथळा फुटपाथ, स्वतंत्र सायकल ट्रॅक, बसण्यासाठी जागा उपलब्ध करून देण्यासोबत सुरक्षितपणे नागरिकांना रस्ता ओलांडता येईल, याद्दष्टिनेही उपाययोजना करण्यात येत आहेत. याच अंतर्गत 'अर्बन स्ट्रीटस्केप्स' हा प्रकल्प राबवताना पथदिवे, चौकांची नव्याने रचना, सेवा वाहिन्या याकडेही विशेष लक्ष दिले जात आहे. ही सर्व कामे 'इंडियन रोड्स काँग्रेस' (आयआरसी) च्या मानकांनुसार केली जात आहेत.

पॅरिस, कोपनहेगन आणि ॲमस्टरडॅम अशा शहरांनी पादचारी आणि सायकलस्वार यांच्यासाठी रस्त्यावर प्रवास सुरक्षित असावा, यासाठी मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक केली आहे. या शहरांप्रमाणेच आता पिंपरी चिंचवड महानगरपालिका पादचारी व सायकलस्वारांसाठी सुरक्षित रस्ते बनवण्यास प्राधान्य देत आहे.

### पादचारी व सायकलस्वारांचे सर्वेक्षण

» 'अर्बन स्ट्रीटस्केप्स' या प्रकल्पाचा आराखडा तयार करताना नागरिक, निवासी संस्था, विक्रेते, दुकानदार, वाहतूक पोलीस आदी सर्व घटकांचे आयटीडीपी इंडिया संस्थेने सर्वेक्षण केले. मुंबई-पुणे जुन्या महामार्गावर केलेल्या सर्वेक्षणात ७९ टक्के नागरिकांनी सांगितले की, रस्त्यांची रचना सुधारली गेल्यास सायकल चालवणे व फुटपाथवरून पायी चालण्याचे प्रमाण वाढेल. ८७ टक्के नागरिकांनी रस्त्याची सुरक्षित रचना आणि जागेचे पुनर्वितरण करण्यास पाठिंबा दिला. ८७ टक्के नागरिकांना रस्ता ओलांडताना असुरक्षित वाटत असल्याचे मत व्यक्त केले. ८२ टक्के नागरिकांनी सध्याचा रस्ता मुलांसाठी व ज्येष्ठ नागरिकांना असुरक्षित असल्याचे सांगितले. ७६ टक्के नागरिकांना रात्री प्रवास करताना समस्या जाणवत होत्या तर ५९ टक्के नागरिकांनी अति वेगाने जाणारी वाहने ही मोठी समस्या असल्याचे मत मांडले.

"पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अंतर्गत येणारे रस्ते केवळ वाहनांसाठी नाही तर पादचारी, सायकलस्वार यासह सर्वांसाठी सुरक्षित असतील, याकडे प्राधान्याने लक्ष देत आहोत. शहरातील रस्ते सुरक्षित करण्याच्या दृष्टिने 'अर्बन स्ट्रीटस्केप्स' प्रकल्प उपयुक्त ठरत आहे. रस्त्यांची कामे करताना सार्वजनिक-खासगी वाहनांसोबतच पादचारी, सायकलस्वार नागरिक यांचाही विचार केला जात आहे.

- शेखर सिंह, आयुक्त तथा प्रशासक, पिंपरी चिंचवड महानगरपालिका.

---

# भाजप महिला मोर्चाचा चौंडीला विशेष भेट दौरा

## शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे यांचा पुढाकार; पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीचे औचित्य

**पिंपरी | प्रतिनिधी**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंती वर्षाचे औचित्य साधून पिंपरी-चिंचवड शहर भाजप महिला मोर्चाच्या वतीने अहमदनगर जिल्ह्यातील चौंडी येथील त्यांच्या ऐतिहासिक जन्मस्थळाला नुकताच एक विशेष भेट दौरा आयोजित करण्यात आला होता.



महिला मोर्चाच्या अध्यक्षा सुजाता पालांडे यांच्या नेतृत्वात आणि भाजप शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि विजय शिंदे यांच्या संयोजनाने हा दौरा यशस्वीरित्या पार पडला. या दौऱ्यात एकूण ४२ महिलांनी उत्साहाने सहभाग घेतला.

या ऐतिहासिक स्थळी प्रसिद्ध कीर्तनकार शारदाताई मुंढे यांचे प्रेरणादायी कीर्तन आयोजित करण्यात आले होते. अहिल्यादेवी होळकर यांच्या कार्याची महती सांगतानाच, महिलांवरील वाढत्या अत्याचारांबाबत चिंता व्यक्त करण्यात आली. या प्रसंगी उपस्थित सर्व महिलांनी "महिलांवर अत्याचार होऊ देणार नाही" अशी दृढ शपथ घेतली, ज्यामुळे सामाजिक बांधिलकी आणि संरक्षणाचा संदेश देण्यात आला.

या दौऱ्यात महिला मोर्चा अध्यक्षा सुजाता पालांडे यांच्यासह रोहिणी मांधरे, स्वाती देशमुख, कविता हिंगे, नीतू भालेराव, दिपाली कलापुरे, मंजू गुप्ता, ज्योती शाह, शोभा थोरात, जयश्री मकवाना, सीमा बोरसे, वैशाली वाखरे, विद्या अहिरे, कविता तांबोरे, सुवर्णा नाझरेकर, पल्लवी मारकड, निता भालेराव, आणि रंजना जगताप या प्रमुख महिला पदाधिकारी व कार्यकर्त्या सहभागी झाल्या होत्या. यावेळी अहिल्यादेवी होळकर यांच्या महान कार्याविषयी सविस्तर माहिती देण्यात आली, ज्यामुळे त्यांच्या त्याग आणि दूरदृष्टीची जाणीव उपस्थितांना झाली. अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंती वर्षात आयोजित केलेल्या या विशेष दौऱ्यामुळे त्यांच्या कार्याला आदरांजली वाहण्यात आली, महिलांच्या सक्षमीकरण आणि संरक्षणाचा संकल्प पुन्हा एकदा दृढ करण्यात आला.

# फाटलेल्या आभाळाला पालिकेचा ठिगळे लावण्याचा प्रयत्न

## नगर रस्त्यावर महापालिकेची होर्डिंग हटवण्याची कारवाई, मात्र धोकादायक अतिक्रमणे अद्यापही कायम, कारवाई पुरेशी नसल्याची नागरिकांची प्रतिक्रिया

**पुणे | प्रतिनिधी**

धानोरी-पोरवळ रस्त्यावर झालेल्या होर्डिंग दुर्घटनेनंतर पुणे महापालिकेने बेकायदेशीर फलक, फ्लेक्स, पोस्टर्स आणि बॅनर्स हटवण्यासाठी शहरभर मोहीम सुरू केली आहे. आकाशचिन्ह विभागाच्या माहितीनुसार शुक्रवारी (दि. २३) केलेल्या कारवाईत १०१ अनधिकृत होर्डिंग हटवण्यात आले. मात्र, हजारोंच्या संख्येत फलक, फ्लेक्स, पोस्टर्स आणि बॅनर्स असताना ही कारवाई अतिशय अपुरी असल्याचे नागरिकाचे म्हणणे आहे. अनेक धोकादायक अतिक्रमणे अद्यापही कायम असल्याने तातडीने अधिक व्यापक कारवाईची मागणी या भागातील जागरूक नागरिकांनी केली आहे.

स्थानिक रहिवाशांचे म्हणणे आहे की, अनेक बेकायदेशीर संरचना अद्यापही तशाच शिल्लक आहेत. विमाननगरमधील प्रियंका सोनी म्हणाल्या, “१०० फलक हटवणे ही पुरेशी कारवाई नाही. अनेक महत्त्वाच्या भागांमध्ये प्रत्यक्षात कोणतीही ठोस कारवाई दिसत नाही आणि त्यामुळे नागरिकांच्या सुरक्षेचा धोका कायम आहे.”



### मोहीम अधिक तीव्र करणार : महापालिका

» महापालिकेचे अधिकारी सांगतात की, “शहरातील सर्व बेकायदेशीर फलक व फ्लेक्स हटवण्यासाठी आमची मोहीम सुरू झाली आहे. पुढील काळात ती अधिक गतीने राबवली जाईल.” ‘फक्त शुक्रवारी १०१ अनधिकृत होर्डिंग काढून टाकण्यात आले. आता ही मोहीम अधिक तीव्र केली जाईल,” असे परवाने आणि आकाशचिन्ह विभागाचे उपायुक्त प्रशांत ठोंबरे यांनी सांगितले. असे असले तरी नागरिकांमध्ये अस्वस्थता आहे. त्यांचं म्हणणं आहे की, ही नुकतीच घडलेली दुर्घटना बेकायदेशीर फलकांच्या धोक्याची गंभीर आठवण करून देणारी आहे आणि याआधीच्या अपुऱ्या प्रतिसादावरही प्रकाश टाकणारी आहे. या समस्येकडे केवळ दुर्घटनेनंतरच नाही, तर एक सततचं धोरण म्हणून गांभीर्याने पाहण्याची गरज आहे.

समाज कार्यकर्त्या प्रभा करपे यांनीही चिंता व्यक्त करत त्वरित आणि सातत्यपूर्ण कारवाईची गरज अधोरेखित केली. त्या म्हणाल्या, “जर एखादा फलक नियमबाह्य आढळला, तर संबंधित महापालिका अधिकारी आणि जाहिरात संस्था यांना जबाबदार धरले पाहिजे. विशेषतः संवेदनशील आणि धोकादायक भागांमध्ये स्वतंत्र पाहणी करून ते फलक हटवण्यासाठी मोहीम राबवली पाहिजे.”

दरम्यान, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (पीएमआरडीए) त्यांच्या कार्यक्षेत्रात ९६७ बेकायदेशीर फलक असल्याचा धक्कादायक अहवाल दिला आहे. गेल्या पाच महिन्यांत अतिक्रमणविरोधी विभागाने यापैकी केवळ ९० फलक हटवले आहेत. त्यातूनच ही कारवाई पुरेशी नसल्याचे समोर येत आहे.

नुकत्याच झालेल्या बैठकीत पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे प्रमुख ए. म्हसे यांनी तत्काळ उपाययोजनांची मागणी केली. ते म्हणाले, “वाहतुकीस अडथळा निर्माण करणारे किंवा नागरिकांच्या सुरक्षेला धोका पोहोचवणारे फलक तातडीने हटवले पाहिजेत,” त्यांनी २६ मेपासून कठोर कारवाई सुरू होणार असल्याची घोषणा केली. म्हसे यांनी हेदेखील स्पष्ट केले की, “बेकायदेशीर फलकामुळे जर जीवितहानी, जखम किंवा मालमत्तेचे नुकसान झाले, तर मालक आणि जाहिरात संस्थांवर फौजदारी गुन्हे दाखल केले जातील. “सध्या सणसवाडी आणि भुकूममध्ये प्रत्येकी एक अशा दोन एफआयआर दाखल करण्यात आल्या आहेत,” अशी माहिती त्यांनी दिली.

या उच्चस्तरीय बैठकीला अतिरिक्त महानगर आयुक्त दीपक सिंगला, सतर्कता अधिकारी आणि पोलीस अधीक्षक अमोल तांबे, नगर नियोजन संचालक सुनील मराळे, मुख्य अग्निशमन अधिकारी देवेंद्र पोटफोडे आणि उपायुक्त दीप्ती सूर्यवंशी-पाटील , श्वेता पाटील उपस्थित होते.

### महापालिकेने हटवलेले बेकायदेशीर होर्डिंग

| प्रकार | संख्या |
|---|---|
| होर्डिंग | २ |
| फ्लेक्स | ६० |
| झेंडे | ४ |
| पोस्टर्स | २६ |
| की-ऑक्स | ९ |
| एकूण | १०१ |

# पोलिसांच्या कामात राजकीय हस्तक्षेप नसावा : उपमुख्यमंत्री अजित पवार

## नागरिकांच्या अपेक्षापूर्ती करण्याकरीता काम स्वच्छ, पारदर्शक पद्धतीने काम करावे, असे प्रतिपादन राज्याचे उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी केले.

**पुणे | प्रतिनिधी**

पोलीस ही शासन व्यवस्थेतील महत्त्वाची संस्था असून शासनाचा दृश्य प्रतिनिधी म्हणून ते काम करीत असतात. पोलीस दलाकडून देण्यात येणाऱ्या वागणुकीवर समाजात पोलीस दलाची पर्यायाने शासनाची प्रतिमा निर्माण होत असते. पोलीस ठाण्यात आल्यानंतर नागरिकांना चांगली सेवा मिळाली पाहिजे, समाजातील अपप्रवृत्तीस प्रतिबंध घालण्यासोबतच चुकीचे काम करणाऱ्यांना शासन झाले पाहिजे, त्यामध्ये राजकीय हस्तक्षेप नसला पाहिजे आणि कायदा सुव्यवस्था सुस्थितीत राहिली पाहिजे, अशी अपेक्षा नागरिकांची असते. त्यामुळे शासन म्हणून नागरिकांच्या अपेक्षापूर्ती करण्याकरीता काम स्वच्छ, पारदर्शक पद्धतीने काम करावे, असे प्रतिपादन राज्याचे उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी केले.



पुणे ग्रामीण पोलीस अधीक्षक कार्यालयाच्या अधिनस्त नारायणगाव पोलीस ठाणे नवीन इमारतीच्या लोकार्पण प्रसंगी ते बोलत होते. यावेळी म्हाडाच्या पुणे गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळाचे सभापती शिवाजीराव आढळराव पाटील, आमदार दिलीप वळसे पाटील, माजी आमदार अतुल बेनके, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, पोलीस अधीक्षक संदीप सिंह गिल्ल, अपर पोलीस अधीक्षक रमेश चोपडे, उप विभागीय अधिकारी गोविंद शिंदे, परिविक्षाधीन पोलीस उपअधीक्षक भाग्यश्री धीरबस्सी, उप विभागीय पोलीस अधिकारी रवींद्र चौधर आदी उपस्थित होते.

### जिल्हा पोलीस दलाकरिता निधी मंजूर

» राज्यात २१ हजार कोटी रुपये सर्व जिल्ह्यांच्या जिल्हा नियोजन समितीला उपलब्ध करुन देण्यात आले आहे. यापैकी पोलीस दलाच्या पायाभूत सुविधांकरिता ६०० कोटी रुपये मंजूर करण्यात आले आहे. १ हजार ४०० कोटी रुपयाचा सर्वाधिक निधी पुणे जिल्ह्याला दिला असून यापैकी ४२ कोटी रुपये जिल्हा पोलीस दलाकरिता मंजूर करण्यात आले. त्यामुळे पुणे व पिंपरी चिंचवड शहर आणि जिल्हा ग्रामीण दलाने एकत्रितरित्या समन्वयाने सायबर गुन्हे प्रतिबंधात्मक उपाययोजना, अँटी ड्रोन गन, सीसीटीव्ही कॅमेरे, वाहने अशाप्रकारे नागरिकांच्या सुरक्षितेतच्यादृष्टीने प्राधान्याने पोलीस दलासाठी आवश्यक असणाऱ्या बाबींवर भर देण्याचा सूचना दिल्या आहे. राज्य शासनाच्या कार्यालयाच्या इमारतींचे नूतनीकरणाकर भर देण्यात येत असून त्यानुसार सर्वत्र काम सुरु आहे.

# रहिवाशांचा तीव्र विरोध; पुनावळे कचरा डेपोचे आरक्षण रद्द

## रहिवाशांनी तीव्र विरोध केल्याने कचरा डेपोचे आरक्षण रद्द करण्यात आले असून, त्या जागेत व्यापारी संकुलाचे आरक्षण टाकण्यात आले आहे.

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहराची वाढती लोकसंख्या लक्षात घेऊन महापालिकेकडून पुनावळे येथे कचरा डेपो उभारण्यात येणार होता. त्यासाठी तेथील वन विभागाची जागा आरक्षित करण्यात आली होती. मात्र, त्या भागांत मोठ्या प्रमाणात लोकवस्ती झाल्याने तसेच, रहिवाशांनी तीव्र विरोध केल्याने कचरा डेपोचे आरक्षण रद्द करण्यात आले असून, त्या जागेत व्यापारी संकुलाचे आरक्षण टाकण्यात आले आहे. त्यामुळे शहरात दुसरा कचरा डेपो होणार नसल्याचे स्पष्ट झाले आहे.

शहरातून सध्या दररोज 1 हजार 200 टन ओला व सुका कचरा जमा होतो. तो संपूर्ण कचरा 81 एकर जागेतील मोशी येथील डेपोत नेऊन टाकला जातो. तेथील कचर्‍यापासून वीज, खत, इंधन तयार केले जाते.

कचर्‍याचा भार सहन करण्याची मोशी कचरा डेपोची क्षमता संपली आहे. तेथे तब्बल 30 ते 35 वर्षांपासूनचा कचर्‍याचे डोंगर आहेत. दुसरीकडे, शहर झपाट्याने वाढत असल्याने कचर्‍याची निर्मिती मोठ्या प्रमाणात होत आहे.

शहराची भविष्याची गरज ओळखून महापालिकेने पुनावळे येथील वन विभागाच्या जागेत कचरा डेपोचे आरक्षण टाकले. तेथील 26 हेक्टर जागा कचरा डेपोसाठी सन 2008 मध्ये मंजूर करण्यात आली आहे. तेथील 22.8 हेक्टर जागेच्या बदल्यात महापालिकेने चंद्रपूर जिल्ह्यातील वन विभागाशेजारील तितकीच जागा खरेदी करून देणार होती. स्थानिक नागरिकांना विश्वासात घेऊन अद्ययावत तंत्रज्ञानाचा कचरा डेपो उभारणार, असे आयुक्त शेखर सिंह यांनी स्पष्ट केले होते.

मात्र, भरवस्तीमध्ये कचरा डेपो निर्माण केल्याने दुर्गंधी निर्माण होईल. डेपोसाठी शेकडो झाडे तोडण्यात येतील, असे सांगत स्थानिक नागरिक, हाऊसिंग सोसायटीचे सदस्यांनी या प्रकल्पास विरोध केला. प्रकल्पाविरोधात वेगवेगळी आंदोलने करण्यात आली. त्याला लोकप्रतिनिधींसह माजी नगरसेवकांचाही पाठींबा मिळाला. त्या प्रकरणी विधानसभेच्या अधिवेशनातही मुद्दा उपस्थित करण्यात आल्या होता. कचरा डेपो उभारला जाणार नाही. त्याऐवजी ऑक्सिजन पार्क तयार केले जाईल, असे आश्वासन अधिवेशात देण्यात आले होते. त्याबाबत तत्कालिन मुख्यमंत्र्यांसोबतही बैठक झाली होती.



### दरमहा लाखो रूपयांचे उत्पन्नाचा पालिकेचा दावा

» मात्र, त्या संदर्भातील आदेश तसेच, आरक्षण रद्दबाबतचे कोणतेची पत्र राज्य शासनाकडून प्राप्त झाले नसल्याने संभ्रम कायम होता. महापालिका प्रशासनाने नागरिकांसह लोकप्रतिनिधींचा विरोध लक्षात घेऊन कचरा डेपोचे आरक्षणच रद्द करून टाकले आहे. नव्या सुधारित विकास आराखड्यात आरक्षण क्रमांक 7/95 आणि 7/95 अशा दोन जागेवर सुपर अ‍ॅड्मिस्टेटीव्ह कम कमर्शिअल कॉम्प्लेक्स आणि कन्व्हेंशनल सेंटरचे (एसएसीसी अ‍ॅण्ड कन्व्हेंशनल सेंटर -व्यापारी संकुल) आरक्षण टाकण्यात आले आहेत. नकाशावर तो भाग गुलाबी रंगाने दर्शविण्यात आला आहे. तेथे मुंबई येथील वांद्रे कुर्ला कॉप्लेक्सच्या धर्तीवर पीपीपी तत्वार उभारले जाणार आहे. तेथे आंतरराष्ट्रीय दर्जाचे दालन व कार्यालये तसेच, शॉपींग मॉल असणार आहेत. त्यातून महापालिकेस दरमहा लाखो रूपयांचे उत्पन्न मिळेल, असा दावा महापालिकेच्या अधिकार्‍यांनी केला आहे. दरम्यान, कचरा डेपोचे आरक्षण रद्दच्या निर्णयाचे स्थानिक रहिवाशांकडून स्वागत केले जात आहे.

### गावांचा समावेश झाल्यास कचराकोंडी होणार

» समाविष्ट गावांमुळे कचरा समस्या होणार गंभीर शहर झपाट्याने वाढत आहे. पिंपरी-चिंचवडची लोकसंख्या 30 लाखांच्या पुढे गेली आहे. पिंपरी-चिंचवडमध्ये हिंजवडी, माण, मारूंजी, जांबे, नेरे, सांगवडे, गहुंजे या सात गावांचा समावेश करण्याची प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे. देहूरोड कॅन्टोन्मेंट बोर्डाचा नागरी भाग तसेच, पुण्यातील कळस, दिघी आणि बोपखेलचा उर्वरित भाग पिंपरी-चिंचवडमध्ये समाविष्ट केला जाणार आहे. त्यामुळे शहराची हद्द बरीच वाढणार आहे. हा सर्व भाग पिंपरी-चिंचवडमध्ये विलीन झाल्यास शहराचे क्षेत्रफळ 181 चौरस किलोमीटरवरून तब्बल 250 चौरस किलोमीटर होणार आहे. लोकसंख्याही तब्बल 35 लाखांपर्यंत जाऊन पोहचणार आहे. त्यामुळे कचरा समस्या आणखी गंभीर रूप धारण करू शकते

> प्रारूप शहर विकास आराखड्यात पुनावळे येथील कचरा डेपोचे आरक्षण रद्द करण्यात आले आहे. त्या ठिकाणी सुपर अ‍ॅड्मिस्टेटीव्ह कम कमर्शिअल कॉम्प्लेक्सचे (एसएसीसी) प्रकल्पाचे आरक्षण टाकण्यात आले आहे.
>
> - प्रसाद गायकवाड, उपसंचालक, नगर रचना विभाग, महापालिका

# कॅन्सर पेशंटना दिलासा! थेरगावात उभे राहणार 100 बेडचे हॉस्पिटल

## पीपीपी तत्त्वावर 30 वर्षे व्यवस्थापन; साठ कोटी रूपये ठेकेदाराला देण्याला समितीची मान्यता

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या वतीने थेरगाव रुग्णालयासमोरील मोकळ्या जागेत कॅन्सर (कर्करोग) रुग्णालय पीपीपी (सार्वजनिक खासगी भागीदारी) तत्त्वावर उभारण्यात येणार आहे. येत्या दोन वर्षात रुग्णालयाचे बांधकाम पूर्ण करुन ते सुरू करण्यात येणार आहे. संबंधित ठेकेदाराला महापालिका खर्चाची निम्मी रक्कम म्हणून 60 कोटी 6 लाख रूपये देणार असून, ते 30 वर्षे रुग्णालय चालविणार आहेत. त्या खर्चास आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी स्थायी समितीची गुरूवारी (दि.22) मान्यता दिली आहे.

गेल्या काही वर्षांत कॅन्सरग्रस्त रुग्णांची संख्या सातत्याने वाढत आहे. मात्र, पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या रुग्णालयांत रुग्णांसाठी उपचाराची सोय उपलब्ध नाही. त्यामुळे महापालिकेने कॅन्सर रुग्णालय उभारण्याचे नियोजन केले आहे. शहरातील गोरगरीब व सर्वसामान्य कॅन्सरग्रस्त रुग्णांना अल्प दरात उपचार मिळावेत, या उद्देशाने हे रुग्णालय उभारण्यात येणार आहे. यासाठी महापालिकेच्या वैद्यकीय विभागाचे एक पथक सुरत शहरातील पीपीपी तत्त्वावर सुरू असलेल्या रुग्णालयाची पाहणी करण्यासाठी गेले होते. त्यानंतर त्याबाबतचा अहवाल सादर करण्यात आला.

थेरगाव येथील रुग्णालय आणि शंकर गावडे कामगार भवनाच्यामध्ये 35 गुंठे रिकामी जागा आहे. या जागेत डिझाईन, बिल्ड, फायनान्स, ऑपरेट, ट्रान्सफर (डीबीएफओएफ) तत्त्वावर 100 बेडचे कॅन्सर रुग्णालय उभारण्यात येणार आहे. त्यासाठी निविदा प्रक्रिया राबवण्यात आली. त्यामध्ये 30 वर्षांसाठी रुग्णालय बांधून ते चालवायचे आहे. त्यासाठी 24 सप्टेंबर 2024 ला 143 कोटी रूपये खर्चाची वायबिलिटी गॅप फंड प्रकाराची निविदा काढण्यात आली. त्यामध्ये केवळ एकाच ठेकेदार संस्थेने सहभाग नोंदवला. त्या एकमेव ठेकेदार संस्थेला पात्र ठरविण्यात आले आहे.




### अकरा मजली इमारत असणार

» अकरा मजली इमारतीचे बांधकाम ठेकेदार संस्था करणार आहे. बांधकाम पूर्ण झाल्यानंतर आवश्यक वैद्यकीय यंत्रसामुग्री संस्था उपलब्ध करून देणार आहे. त्यात अद्ययावत असे प्रकाराचे वैद्यकीय उपचारासाठी लागणारे मशिनरी व साहित्य असणार आहेत. तसेच, वैद्यकीय डॉक्टर, परिचारिका, वॉर्ड बॉय व इतर तांत्रिक असे सर्व प्रकारचे मनुष्यबळ तेच पुरविणार आहेत. इमारत बांधण्यासाठी दोन वर्षांची मुदत आहे. त्यानंतर 28 वर्षे ते रूग्णालय चालवतील. त्यांना महापालिका दोन वर्षांत एकूण 60 कोटी रूपये देणार आहे. ती रक्कम 25 टक्के हप्तानुसार चार टप्प्यात दिली जाणार आहे. इमारत पूर्ण होऊन रुग्णांवर उपचार सुरू झाल्यानंतर शेवटचा 25 टक्के हप्त्याची रक्कम देण्यात येणार आहे.

# ‘अमृत भारत’मधील दौंड रेल्वे स्थानकाच्या कामांना खीळ

## ठेकेदार आणि अधिकाऱ्यांच्या संगनमतामुळे ही योजना रखडल्याचा आरोप नागरिक करीत आहेत.

**पुणे | प्रतिनिधी**

केंद्र सरकारने अमृत भारत योजनेंतर्गत दौंड रेल्वे जंक्शनच्या विकासासाठी मोठा निधी मंजूर केला. त्याचे उद्घाटन 6 ऑगस्ट 2023 रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते ऑनलाइन झाले. दौंड रेल्वे स्थानक आणि आजूबाजूच्या परिसराचे सुशोभीकरण, इमारती आणि शासकीय कार्यालयांच्या विकासाचा यात समावेश होता.

दौंड हे ब्रिटिशकालीन रेल्वे जंक्शन असून, त्याला मोठा ऐतिहासिक वारसा लाभला आहे. मात्र, निधी मिळून जवळपास पावणेदोन वर्षे उलटूनही विकासाची कामे अत्यंत संथगतीने सुरू असून, ठेकेदार आणि अधिकाऱ्यांच्या संगनमतामुळे ही योजना रखडल्याचा आरोप नागरिक करीत आहेत.

जवळपास 100 वर्षांहून अधिक काळ असलेले वाफेच्या इंजिनचे लोकोशेड काही वर्षांपूर्वी काढण्यात आले होते. त्याजागी कोट्यवधी रुपये खर्च करून इलेक्ट्रिक लोकल दुरुस्तीचा कारखाना उभारण्याचे काम पूर्ण झाले आहे.




### केडगाव स्थानकाचे काम पूर्ण, दौंडकडे दुर्लक्ष का?

» एकीकडे केडगाव रेल्वे स्थानकाचे काम पूर्ण होऊन त्याचे उद्घाटनही झाले आहे, तर दुसरीकडे दौंड रेल्वे प्रशासनाने या कामांबाबत बोटचेपी भूमिका घेतली आहे, हे अनाकलनीय आहे. दौंड जंक्शन हे उत्तर भारत, दक्षिण भारत आणि देशाच्या इतर भागांमध्ये जाण्यासाठी एक महत्त्वाचे आणि सोयीस्कर ठिकाण आहे.

मात्र, काम पूर्ण होऊन तीन वर्षांचा कालावधी लोटला तरी हा प्रकल्प अजूनही सुरू झालेला नाही. यासंदर्भात रेल्वे प्रशासनाकडे विचारणा केली असता, त्यांनी पाण्याची कमतरता हे कारण दिले. बारामतीच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी दोनवेळा या प्रकल्पाला भेट देऊन रेल्वे मंत्रालयाशी संपर्क साधला, तरीही हा प्रश्न मार्गी लागलेला नाही.

रेल्वे प्रशासनाने जसे काम करून घ्यायचे असते, तसेच ते करून घेतात. दौंडमध्ये झालेल्या कामांचा दर्जा आणि गुणवत्ता नियंत्रणाद्वारे तपासणी करणे आवश्यक आहे. विशेषतः भर उन्हाळ्यात केलेल्या सिमेंटच्या रस्त्यांवर पाण्याचा अत्यंत कमी वापर झाल्याचे दिसून आले आहे. दर्जेदार कामे हवी असल्यास रेल्वे प्रशासनाने याकडे लक्ष देणे गरजेचे आहे; अन्यथा सरकारने दिलेला निधी अधिकारी आणि ठेकेदारांच्या मनमानीने खर्च होईल, यात शंका नाही. रेल्वेला येथून चांगला महसूलही मिळतो. असे असूनही राजकीय नेत्यांच्या इच्छाशक्तीच्या अभावामुळे दौंड शहर आणि रेल्वेचा विकास खुंटला आहे. रेल्वे प्रशासनाकडे स्वतःच्या मालकीची मुबलक जागा उपलब्ध असतानाही तिचा योग्य वापर केला जात नाही.

दौंड रेल्वे जंक्शनचा विकास झाल्यास बारामतीचे महत्त्व कमी होईल, अशी एक धारणा दौंडकरांमध्ये आहे. यामुळेच दौंडचा विकास थांबला आहे, असे त्यांना वाटते. रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी अमृत भारत योजनेंतर्गत दिलेल्या निधीचा विनियोग कसा झाला आणि कामाचा दर्जा काय आहे, याची तपासणी होणे आवश्यक आहे एकीकडे केडगाव रेल्वे स्थानकाचे काम पूर्ण होऊन त्याचे उद्घाटनही झाले आहे, तर दुसरीकडे दौंड रेल्वे प्रशासनाने या कामांबाबत बोटचेपी भूमिका घेतली आहे, हे अनाकलनीय आहे..

### राजकीय हेतू आणि कामांचा दर्जा

» दौंड रेल्वे जंक्शनचा विकास झाल्यास बारामतीचे महत्त्व कमी होईल, अशी एक धारणा दौंडकरांमध्ये आहे. यामुळेच दौंडचा विकास थांबला आहे, असे त्यांना वाटते. रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी अमृत भारत योजनेंतर्गत दिलेल्या निधीचा विनियोग कसा झाला आणि कामाचा दर्जा काय आहे, याची तपासणी होणे आवश्यक आहे. काही रेल्वे अधिकारी प्रशासनाला दाखविण्यासाठी सहा-आठ महिन्यांसाठी बदली होऊन जातात आणि पुन्हा त्याच पदावर दौंडमध्ये कसे येतात? असा प्रश्नही उपस्थित केला जात आहे.

### कामांचा दर्जा आणि ठेकेदार-अधिकारी संगनमत

» एकीकडे भारत सरकार प्रवाशांना उत्तम सुविधा देण्यासाठी प्रयत्न करीत असताना दौंडमध्ये रेल्वे अधिकारी आणि ठेकेदार यांचा मनमानी कारभार सुरू आहे. एका रेल्वे अधिकाऱ्याने सांगितले की, आमची तीन वर्षांनी बदली होत असते, त्यामुळे आम्ही कोणी काय सांगते, याकडे लक्ष देत नाही.

# सततच्या पावसाने ऐन मे मध्येच गारठली बारामती

## यंदा बारामती तालुक्याने उन्हाचा कहर अनुभवला. ही परिस्थिती दोन-तीन दिवसातच पावसाने बदलून टाकली

**पुणे | प्रतिनिधी**

तीन दिवसांपासून बारामती शहर व तालुक्यात अवकाळी पाऊस पडत आहे. शुक्रवारी (दि. 23) दिवसभर पावसाची रिपरिप सुरू होती. पावसामुळे वातावरणात कमालीचा गारवा निर्माण झाला आहे. ऐन मे महिन्यातच गारठण्याची वेळ नागरिकांवर आली आहे.

यंदा बारामती तालुक्याने उन्हाचा कहर अनुभवला. अगदी मार्चच्या सुरुवातीपासूनच उन्हाचा चटका सोसावा लागला. मार्च, एप्रिल आणि मेच्या सुरुवातीला प्रचंड उन्हामुळे नागरिक हैराण झाले होते. ही परिस्थिती दोन-तीन दिवसातच पावसाने बदलून टाकली. ढगाळ वातावरण आणि सतत सुरू असलेली पावसाची रिपरिप यामुळे वातावरणात कमालीचा गारवा निर्माण झाला आहे. त्यामुळे गारठण्याची वेळ नागरिकांवर आली आहे.



अवकाळी पावसाचा परिणाम शहरासह गावोगावच्या आठवडे बाजारांवर होत आहे. पावसामुळे ग्राहक फिरकत नसल्याने परिणामी बाजारात विक्रीसाठी आणलेला शेतीमाल मिळेल त्या किमतीला विकावा लागत आहे.

बुधवारपासून शहर व तालुक्यात पावसाचा जोर कायम आहे. शुक्रवारीही तो कायम राहिला. दुपारी चार वाजेपर्यंत शहर व तालुक्यात पावसाच्या सरी कोसळत होत्या. शहरात वीजपुरवठा करणा-या वाहिन्या भूमिगत आहेत. त्यामुळे पावसाळ्यातही अखंडित वीजपुरवठा यापूर्वी होत होता. यंदा मात्र विविध कामांसाठी सुरू असलेल्या खोदाईमुळे पावसात विजेचा खेळखंडोबा होत असल्याचे पहायला मिळाले. शहराच्या अनेक भागात गुरुवारी रात्री वीजपुरवठा खंडित झाला होता.

### वीजपुरवठा खंडित

» शहर व तालुक्यात पावसाचा जोर कायम आहे. शुक्रवारीही तो कायम राहिला. दुपारी चार वाजेपर्यंत शहर व तालुक्यात पावसाच्या सरी कोसळत होत्या. शहरात वीजपुरवठा करणा-या वाहिन्या भूमिगत आहेत. त्यामुळे पावसाळ्यातही अखंडित वीजपुरवठा यापूर्वी होत होता.

### जनजीवन विस्कळीत

» सततच्या पावसाने जनजीवन कमालीचे विस्कळीत झाले आहे. पाऊस उघडीपच देत नसल्याने नागरिकांना घराबाहेर पडणे मुश्किल झाले आहे. दरवर्षी जून, जुलैमध्ये बाहेर निघणारे रेनकोट, छत्र्या यंदा मे मध्येच वापरावे लागत आहेत.